**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठात व्हर्च्युअल सी-फोरद्वारे**
**डॉ. राजेश बुरंगे व डॉ. दिनेश सातंगे यांचे व्याख्यान संपन्न**
**व्याख्यान ऐकण्यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध**

अमरावती -

विद्यापीठाच्या व्हर्च्युअल सी-फोरवरुन 'कोव्हिड १९ च्या पार्श्वभूमीवर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान' या विषयावर विद्यापीठ रा.से.यो. चे प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे यांचे तर 'विद्यार्थी विकास विभागाच्या विद्यार्थीभिमुख योजना व उपक्रम' या विषयावर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे यांचे व्याख्यान संपन्न झाले.

व्याख्यानप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. बुरंगे म्हणाले, जगभरामध्ये कोव्हिड १९ ने भिती निर्माण केली आहे. इतर देशांप्रमाणे भारत सुद्धा कोरोनाचा सामना चांगल्या प्रकारे करीत आहे. अशा कठीण परिस्थितीत आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य विभाग, पोलीस, सैनिक दल, समाजासाठी कार्य करणारे कार्यकर्ते, रा.से.यो. स्वयंसेवक, एन.सी.सी. याचे नेहमीच महत्वपूर्ण योगदान राहीले आहे.

कोरोनाच्या कठीण कार्यकाळात रा.से.यो.च्या वतीने अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले, त्यामध्ये रासेयोच्या रासेयोच्या स्वयंसेवकांनी रक्तदान, सर्वेक्षण, आरोग्यदूत, धान्य वाटप, अन्नदानात सहभाग, मास्क तयार करुन घरोघरी जावून मास्क वाटप, जंतुनाशक फवारणी करण्यामध्ये सहभाग, पोलीस मित्र, सॅनिटायझरची निर्मिती व वितरण, सोशल मिडीयाद्वारे जनजागृती, आरोग्य सेतू ॲप, औषध वाटप आदी उपक्रम राबवून कोरोना सुरक्षेबाबत जनजागृती केली. लोकांच्या मनातील भिती दूर करुन घ्यावयाची दक्षता, सतर्कता, उपाययोजना या बाबत रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी पाचही जिल्ह्यामध्ये कार्य केले. 'स्वच्छ भारत - स्वस्थ भारत' हा कार्यक्रम एम.एच.आर.डी. व विद्यापीठ रासेयो यांचे संयुक्त विद्यमाने रासेयो अधिकारी व जिल्हा समन्वयक यांचेकरीता ऑनलाईन घेण्यात आला. त्या माध्यमातून कोरोनावरील उपाययोजनाबाबत जनजागृती करण्यात आली. प्राचार्य व शिक्षकांनी पुढाकार घेवून विद्यार्थी व गोरगरीबांच्या जेवणाची व त्यांना धान्य कीट वितरण रुग्णांसाठी बेड सुविधा आदी व्यवस्था केली. कोरोना काळात जे विद्यार्थी आपल्या गावी जावू शकले नाही, त्यांचेकरिता विद्यापीठाचेवतीने अन्नधान्यांच्या किटचे वाटप करण्यात आले. संत गाडगे बाबांच्या कार्याचा वसा या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पुढे नेल्याबद्दल कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी रासेयो विद्यार्थ्यांचे कौतुक केल्याचे त्यांनी सांगितले.

विषयावर मांडणी करतांना डॉ. सातंगे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थी विकास विभागाद्वारे विविध योजना, उपक्रम, कार्यक्रम राबविल्या जातात. विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे महाविद्यालयीन स्तरावर निवारण व्हावे, यासाठी प्रत्येक महाविद्यालयात तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी युवा महोत्सव, इंद्रधनुष्य सारख्या स्पर्धांचे आयोजन केल्या जाते. या स्पर्धांमधून सादर होणाऱ्या विविध कलाप्रकारांची त्यांनी याप्रसंगी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थी परिषद निवडणूका, कार्य यासह संत गाडगे बाबा कमवा व शिका, संत गाडगे बाबा विद्याधन योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थी शिक्षण संरक्षण योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना, संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजना, विद्यार्थी विकास निधी शिष्यवृत्ती योजना, विद्यार्थी सुरक्षा विमा योजना आदी योजनांबाबत त्यांनी माहिती दिली. याशिवाय परिसरातील विद्यार्थ्यांसाठी सायकलची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ व्हावे, ताणतणाव कमी व्हावा याकरीता संपन्न झालेल्या मानसिक समुपदेशन कार्यशाळेची माहिती त्यांनी दिली. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी विकास विभागाच्या योजनांचा जास्तीतजास्त लाभ घेण्याचे आवाहन सुद्धा त्यांनी याप्रसंगी केले.

निवेदन व पाहुण्यांचा परिचय जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी करुन दिला. वक्त्यांची व्याख्याने विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर व्हर्च्युअल सी-फोर अंतर्गत उपलब्ध असून त्याचा जास्तीतजास्त लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने प्र-कुलगुरू तथा व्हर्च्युअल सी-फोरचे अध्यक्ष डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व व्हर्च्युअल सी-फोरच्या समन्वयक डॉ. मोना चिमोटे यांनी केले आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**
दि. २४/०७/२०२०.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:\Users\PRO\Desktop\UNIVERSITY NEWS 2020 67